# नीलची शाळा समरहिल –एक अद्‌भुत

अंजली आमोणकर

दैनिक गोमंतक (२१ डिसेंबर २००८)

बव्हंशी लहान मुलांना कारावास वाटणारी,नकोशी वाटणारी जागा म्हणजे शाळा. ते ठरावीक तास, तो ठरावीक अभ्यास ती शिस्त यापैकी,त्यांना खरे तर, काहीच आवडत नसते! त्यांना बाहेर मोकळ्यावर,मनसोक्त हुंदडायचे असते,खेळून खेळून दमायचे असते.त्यांच्या आकर्षणाच्या,आवडीच्या व रमण्याच्या गोष्टी शाळेत असलेल्या गोष्टींपेक्षा निराळयाच असतात. पण हे मोठयांना कुठे कळते?ते देत राहतात धम्मकलाडू व चापट पोळी! मुलांना,त्यांच्या आवडीच्या गोष्टी,कंटाळा येईपर्यंत करू देत रहायचे,म्हणजे आपोआप ती शिक्षणाकडे, शिस्तीकडे व स्वावलंबनाकडे वळतात!.... अशा मतांच्या ‘नील’ मास्तरांनी बालसंगोपनाचा एक क्रांतीकारी मार्ग अवलंबिला व तो म्हणजे.... ‘समरहिल–शाळा!’ ती त्यांनी व त्यांच्या सौभाग्यवतींनी चालू केली, वाढवली व यशस्वी करून दाखवली. जरी त्या वेळच्या सर्व वर्तमानपत्रांनी ‘काय वाट्टेल ते करायला मोकळीक देणारी शाळा’ असे नामाभिधान या शाळेला देऊन टाकलेले होते व इथे शिकणारी मुले म्हणजे सभ्य चालीरीतींचा गंध नसलेल्या रानटी आदिवासींचा मेळावा आहे असे म्हणले तरी विलक्षण कल्पनेतून निघालेली व ‘स्वातंत्र’ म्हणजे ‘स्वैराचार’नव्हे, .‘स्वातंत्र’ म्हणजे जबाबदारी हे उदाहरणातून दाखवून देणारी ‘समरहील’ शाळा आज एक जागतिक पर्यटन केंद्र बनली आहे. ही शाळा इंग्लंडमधल्या लायस्टन गावात, लंडनपासून शंभर मैलांवर आहे. लेखक ए. एस्. नील याने स्वतःच्या लहानपणात शाळांचे अभ्यासाचे,नोकऱ्याचे इतके भयावह अनुभव घेतले की तरूणपणी त्याने आपल्या ‘समरहील’ नावाच्या घरात,पाच विदयार्थ्यांना घेऊन ही शाळा सुरू केली.

मुलांजवळ एक उपजत शहाणपण आणि वास्तवतेचे भान असते. मोठयांनी कोणत्याही सूचना न देता त्याला मोकळेपणा दिला,तर ते मूल त्याच्या क्षमतेएवढे नक्कीच वाटेल,असेच शाळाचालक नीलचे मत होते. ‘समरहिल’ शाळेत वेळापत्रकआहे पण ते शिक्षकांकरता. मुले तासाला बसूही शकतात व वर्गाबाहेरही राहू शकतात –अगदी वर्षानुवर्षे! इथली मुले इतकी आनंदी असतात की ती कधी शाळाही चुकवत नाहीत व घरची आठवणही काढीत नाहीत. मागे वळून पाहताना अंकगणित,संगीत वा तत्सम शालेय विषय न शिकवल्याबद्दल मुले शाळेला दोष देणार नाहीत का? हा सर्वांना नेहमी पडणारा प्रश्न आहे. पण नीलची खात्री आहे की या मुलांमध्ये जर सुप्तावस्थेत आइनस्टाइन वा बिथोवन असतील तर योग्यवेळी ते आपापल्या आवडीच्या क्षेत्रांकडे खेचले जातीलच! इथे नीलबरोबर,त्याची बायकोही काम करते!

नील फक्त शाळा चालवूनच थांबला नाही. तर या पध्दतीच्या शिक्षणावर, शिक्षणपध्दतीवर क्रांतीकारी विचारांमुळे तरूण शिक्षक नीलकडे आकर्षित झाले. या लिखाणांमुळे अनेकांनी आपले आयुष्य या मुलांकरता खर्ची घालायचे ठरवले. या शाळेतून मुलांना संगोपन, धर्म,
नीतीनियम, मुलांच्या समस्या पालकांच्या समस्या, लैंगिकता यावर शिक्षण दिले जाते.समस्याग्रस्त,बालगुन्हेगार मुलांकरता इथे विशेष शिक्षण उपलब्ध आहे.आकडेमोड सांगते की इथून शिकून निघालेल्या कोणत्याही बालगुन्हेगाराने परत कसलाही गुन्हा केलेला नाही.ही एका
प्रकारची सुधारशाळाच म्हणता येईल.

'समरहिल' या पुस्तकात या शाळेविषयी –शिक्षणप्रणालीविषयी सर्व अगदी बारीकबारीक तपशीलांसकट आहे! या पुस्तकाला प्रकाशित होऊन अनेक वर्षे लोटली. पण 'समरहिल' ची व या पुस्तकाची गोडी दिवसेंदिवस वाढत आहे. नीलच्या मृत्यूनंतर ती शाळा बंद पडेल असा अनेकांचा कयास होता. पण समरहिल आजही फुलते आहे. वाह्यात जगातल्या एखादया सत्कृत्यासारखी.

या शाळेची ही अद्‌भुतरम्य सफर वाचताना,वाचक गुंग होऊन जातो हीच या पुस्तकाच्या यशस्वितेची पावती.